महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune
स्पायसर मेमोरीअल कॉलेजसमोर, औंध रोड, औंध, पुणे- ४११ ०६७.
Opp. Spicer Memorial College, Aundh Road, Aundh, Pune- 411 067.
E-mail: cah.diseasecontrol@gmail.com
Telephone No.: 020-25690480/ 81/ 85
Extn: 239/ 240/ 241/ 242/ 243/ 244

जा.क्र. रोनि/FMD लासिकरण फेरी-७ /६३/३६११ /२०२४ पसं-१२पुणे-६७ दि. १२/०८ /२०२५

प्रति,

१. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व)
२. सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रोग अन्वेषण विभाग
३. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व)
४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, विभागीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा , (सर्व)

विषय:- सन २०२५-२६ मध्ये १००टक्के केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळखुरकुत प्रतिबंधात्मक लसीकरण फ़ेरी- ७ वी करीता मार्गदर्शक सूचना.......

संदर्भ :- १. राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमाकरिताच्या केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना
२. रोनि/FMD लासिकरण फेरी-७ /२३ /३२१२/२०२५ पसं-१२,पुणे-६७,दि. २४/०६/२०२५
३.रोनि/NADCP,CADCP,Cold Chain/०४/३४०७/२०२५, पसं-१२,पुणे-६७,दि.२४.०७.२०२५

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये १००टक्के केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण या समुहगट योजनेमधील राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत लाळखुरकुत (FMD) व सांसर्गिक गर्भपात (Brucella) या दोन रोगांवर प्रतिबंधात्मक लसीकरणाद्वारे सन २०२५ पर्यंत नियंत्रण व २०३० निर्मूलन करण्याचे लक्षांकीत आहे. राज्यात दिनांक १७.०२.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीत लाळ खुरकत लसीकरण फेरी -६ पार पडली असून सदर फेरी मध्ये राज्यात एकूण १६६ लक्ष पशुधनास लाळ खुरकत रोग प्रतिबंधक लसीकरण केले गेले आहे . पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रणकार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार या पशुधनास दर सहा महिन्यांनी लाळ खुरकत रोग प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक आहे. यास अनुसरून लाळखुरकुत प्रतिबंधात्मक लसीकरण फ़ेरी- ७ वी राबविण्यास आवश्यक लसमात्रा ऑगस्ट २०२५ या महिन्यात जिल्हास्तरावर केंद्रशासनाद्वारे पुरवठा करण्यात येणार आहेत. लाळ खुरकत लसीकरण फेरी -६ च्या प्राप्त अंतिम अहवालानुसार काही जिल्ह्यांकडे लाळखुरकुत लस मात्रा शिल्लक दिसून येत आहे.

या अनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, १००टक्के केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळखुरकुत प्रतिबंधात्मक लसीकरण फ़ेरी- ७ वी दि. १४ .०८.२०२५ ते २७.०९.२०२५ या कालावधीत राज्यात राबविण्याचे सुनिश्चित केले आहे.केंद्र शासनाकडून लस पुरवठा होईपर्यंत आपणाकडे

शिल्लक असलेल्या लस मात्रा फेरी-७ करिता वापरण्यात याव्यात. लाळ खुरकुत लसीकरण करताना प्राधान्याने या अगोदर रोग प्रादुर्भाव झालेल्या, संकरीत गोवर्गीय पशुधन जात असलेल्या आणि सिरोमॉनिटरिंग साठी निवडलेल्या गावामध्ये प्राधान्याने लसीकरण हाती घ्यावे. सदरची फेरी ३० दिवसात पूर्ण करून उर्वरित १५ दिवसात लसीकरणापासून वंचित पशूना लसीकरण व बुस्टर लसमात्रा द्यावयाच्या आहेत. संदर्भ क्र-२ नुसार लसीकरण फेरी-७ ला प्रारंभ होणेपुर्वी जंत निर्मुलन,जनजागृती,जिल्हा तसेच तालुकास्तरीय सनियंत्रण समित्यांच्या बैठकांचे आयोजन करणे तसेच गावनिहाय लसीकरणाचे सूक्ष्म नियोजन करणे याबाबत सूचित करणेत आले आहे. जिल्हा तसेच गावनिहाय लाळ खुरकुत लसीकरणाचे सूक्ष्म नियोजन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवून जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत यावे.

**लाळ खुरकत लसीकरण फेरी- ७ करिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देणेत येत आहेत.**

१. लसीकरण फेरीपूर्वी, गाव, तालुका, जागरूकता कार्यक्रम राबविण्यात यावेत जेणेकरून पशुपालकांचा मोहिमेतील सहभाग वाढेल. पंचायती राज संस्था आणि शहरी स्थानिक संस्था यांच्या सहकार्याने लसीकरणाचे महत्त्व, लाळ खुरकूत प्रादुर्भाव नियंत्रित करण्याचे फायदे याबद्दल पशूपालकांना शिक्षित करावे. लाळ खुरकुत लसीकरण कार्यक्रमाचे जनजागृती करिता प्रति तालुका १०,००० प्रमाणे एकूण ३५,२०,००० ची वित्तीय मर्यादा सर्व संबंधित जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व) यांना निश्चित करून देण्यात आली आहे. त्यानुसार सदर लसीकरण कार्यक्रमाबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.लसीकरण फेरी सुरु करताना लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांना आमंत्रित करावे. प्रसिद्धीप्रचार आणि लसीकरण मोहीम यांची निवडक छायाचित्रे महापशुधन वार्ता, खात्याचे संकेतस्थळ आदी वर प्रसिद्ध करणेसाठी या कार्यालयास सादर करावीत.

२. लाळ-खुरकुत प्रतिबंधात्मक लसीकरण सुरु करण्याआधी सदर योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या जंतनाशक औषधीचा वापर करुन पशुधनाचे जंतनिर्मूलन करण्यात यावे अश्या सूचना संदर्भ क्र २ नुसार दिल्या आहेत. याकरिता रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचेमार्फ़त स्वतंत्र पणे दिल्या जाणाऱ्या सूचनेनुसार सिरो मॉनिटरिंग साठी निवड केलेल्या गावातील पशुधनास जंतनाशक औषध देतेवेळी शेणाचे नमुने संकलित करावे. तसेच, जंतनाशक औषध प्रत्यक्ष दिलेल्याची खात्री करावी व लसीकरण करतेवेळी लसीकरण पूर्व रक्तजल व जंत निर्मूलन पश्चात शेणाचे नमुने गोळा करण्यात यावेत. संस्थास्तरावर संकलित शेणनमुने संबंधित विभागीय रोगअन्वेषण प्रयोगशाळांना तपासणी करिता सादर करण्यात यावेत. विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा यांनी क्षेत्रीय स्तरावरुन संस्थानिहाय जंत निर्मूलन पूर्व नमुने व जंत निर्मूलन पश्चात शेण नमुने पाठपुरावा करुन प्राप्त करुन घ्यावेत व रोग अन्वेषण विभाग, पुणे यांस दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शेण नमुने परिक्षण अहवाल विहित नमुन्यात सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. लसीकरण मोहिमेपूर्वी, जिल्हा पातळीवरून तालुका पातळीवर लसीची वाहतूक करत असताना ती refrigerated वाहन अथवा ॲक्टिव कूलिंग बॉक्सद्वारे पोहोचवली जाणे आणि नंतर संस्था स्तरावर इच्छित तापमान राखून रेफ्रिजरेटरमध्ये /ILR मध्ये साठवली जाणे आवश्यक आहे. तसेच लसीकरण मोहिमेदरम्यान, लस बर्फामध्ये / जेल पॅकसह लसीकरणाच्या ठिकाणी नेली जाणे हे लसीकरण फेरीची गुणवत्ता निश्चित करताना महत्वपूर्ण असलेने सर्व स्तरावर याबाबत दक्षता घ्यावी.

४. राज्यातील सर्व पात्र पशुधनास त्रिसंयुक्त लाळखुरकुत लस वापरुन पशुधनाचे लसीकरण वर्षातून दोन वेळा करणे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार क्रमप्राप्त आहे. लाळखुरकुत लसीकरणांच्या दोन सलग फेऱ्यांमधील अंतर ६ महिन्यांपेक्षा कमी किंवा १८० दिवसांपेक्षा कमी असावे. मागील फेरीवेळी प्रथम लसीकरण केलेल्या गावांमध्ये या फेरीमध्ये ही प्रथम लसीकरण हाती घ्यावे.

५. गाय व म्हैस वर्गात लाळ खुरकूत लसीकरणाचे किमान पात्र वय ४ महिने आहे. प्राथमिक लसीकरणाच्या एक महिन्यानंतर पहिल्यांदा लसीकरण केलेल्या वासरांना बुस्टर डोस देणे आवश्यक आहे. गो व म्हैस वर्गीय पशुमध्ये २ मी.ली . लसमात्रा intramuscular द्यावी.

६. लसीकरण फेरी राबविली जात असताना सोबत जोडलेल्या परिशिष्ठ -१. नुसार लसीकरण केलेल्या तसेच लसीकरणा पासून वंचित राहीलेल्या पशूंची इयर टॅग सह नोंद ठेवावी. या पशूंना mopping लसीकरणा वेळी फेरीच्या शेवटच्या १५ दिवसांत लसीकरण करणेची दक्षता घ्यावी. या नोंदीचा भारत पशुधन प्रणाली वरील दैनंदिन नोंदी वेळी उपयोग करावा.

७ . स्थलांतरीत होणारे कळप ,मोकाट पशु ,गोशाळे मधील पशु यांचेही लसीकरण करावे.

८. आजारी जनावरे ,गाभण जनावरे, चार महिन्यांपेक्षा कमी वयाची वासरे वगळता सर्व गाय व म्हैस वर्गीय पशुंना लसीकरण मोहिमेदरम्यान लसीकरण करण्यात यावे. प्राथमिक लसीकरणाच्या एक महिन्यानंतर mopping लसीकरण मोहीम १५ दिवस हाती घ्यावी व यामध्ये गाभण, वय, आरोग्य स्थिती किंवा इतर कारणांमुळे लसीकरण न झालेल्या पशूंना न चुकता या कालावधीमध्ये लसीकरण करावे.

९. लसीकरण मोहीम राबविताना संस्था निहाय, गावनिहाय लसीकरण कृती आराखडया नुसार करावे जेणेकरून केंद्र शासन ,राज्य शासनाकडील अधिकारी यांचे भेटीवेळी त्याच ठिकाणी भेट देता येईल. प्रत्येक जिल्ह्याचा गावनिहाय लसीकरण कृती आराखडा केंद्र शासन ,विभागाचे संकेतस्थळ तसेच जिल्ह्याचे प्रशासकीय अधिकारी ,स्थानिक स्वराज्य संस्था यांना अवगत केला जाणार असलेने या बाबत विशेष दक्षता घ्यावी.

१०.लसीकरणाकरिता आवश्यक साधन सामग्री, माहितीचा प्रसार आणि लसीकरण व्याप्ती मध्ये मदत करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, एनजिओ , आणि खाजगी पशुवैद्यक, स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी .

११ . लसीकरणाकरीता नियुक्त आवश्यक अतिरिक्त मनुष्यबळाची (व्हॅक्सिनेटर्स) माहिती व त्यानुसार त्यांची उपलब्धता झालेबाबत खात्री करून लसीकरण तांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण होणे व शीत साखळीचे महत्व याबाबत त्यांना प्रशिक्षित करावे.त्यांनी निर्धारित ठिकाणी वेळा पत्रकानुसार लसीकरण केलेले आहे यांची दैनंदिन पडताळणी करून त्यानंतरच पुढील लसमात्रांचा पुरवठा करावा.त्यांच्या कडून शीत साखळी अबाधित राहत आहे यांची खात्री संबंधित संस्था प्रमुखांनी करावी. सहकारी दुग्ध संस्था ,इतर संस्थाना लस वितरित केल्यानंतर दैनंदिन लसीकरण अहवाल व भारत पशुधन प्रणाली वरील नोंदी पूर्ण

करणे आवश्यक आहे यांची स्पष्ट कल्पना द्यावी व दैनंदिन आढावा घेण्यात यावा. दुर्गम भागात लसीकरण केले जाईल यांची दक्षता घेण्यात यावी.

१२ .लसीकरणासाठी प्रत्येक पशुधनास नवीन निर्जंतुक सुई वापरण्यात यावी.

१३ .पशुधनाचे लसीकरण केल्यानंतर त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेणे बंधनकारक आहे. संस्था प्रमुख यांनी त्यांनी केलेले लसीकरण आणि खाजगी लसीकरण कर्त्याने केलेले लसीकरण त्याच दिवशी अपलोड केले जाईल यांची दक्षता घ्यावी. खाजगी लसीकरण कर्ता दैनंदिन नोंदी घेत आहे का यावर लक्ष ठेवावे. भारत पशुधन प्रणालीवर नोंद पूर्ण केल्यानंतरच लसीकरणाचे मानधन देय राहील यांची त्यांना कल्पना द्यावी . जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांनी भारत पशुधन प्रणालीमधील नोंदींच्या प्रगतीचा लसीकरणकर्ता निहाय आढावा घ्यावा.

१४. सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय रोग अन्वेषण विभाग यांचेकडून दि.१४.०७.२०२५ रोजी परीपत्रीत झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित गांव ज्या संस्थेअंतर्गत येत आहे त्यांनी FMD सेरोमॉनिटरिंगसाठी, लसीकरणापूर्वी आणि लसीकरणानंतरचे रक्तजल नमुने संकलित करावेत. नमुने संकलन करिता निवडलेल्या गावांचे लसीकरण व नमुने संकलन सर्वप्रथम पूर्ण करावे जेणेकरून लसीकरणापूर्वी आणि लसीकरणानंतरचे रक्तजल नमुने तपासणी विहित वेळेत पूर्ण करून निष्कर्ष केंद्र शासनास वेळेवर सादर करता येतील. या निष्कर्षा वर लसीकरण फेरीची गुणवत्ता निश्चित केली जात असलेने सर्व स्तरावर या बाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच, जिल्हानिहाय सादर करण्यात येणारे (pre व post)रक्तजल नमुने नियमित रित्या सादर करण्यासाठी विभागीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा यांनी आपले संबंधित जिल्ह्यांतील क्षेत्रीय यंत्रणेसोबत समन्वय ठेऊन सदर कार्यवाही विहीत कालावधीत पूर्ण होईल, याची खबरदारी घ्यावी.

१५ . राज्यात प्रवेश करणाऱ्या पशुना केलेल्या लाळ खुरकूत लसीकरण नोंदी तसेच लाळ खुरकत आजारांची लक्षणे तपासण्यासाठी प्रत्येक राज्यातील सर्व १३ तपासणी नाक्यावर आवश्यक कार्यवाही करावी.

१६. लाळ खुरकत रोगाची बाधा होण्याची शक्यता असलेल्या वन्य प्राण्यांमध्ये रोगाचा प्रसार रोखण्यासाठी वन इंटरफेसवर असलेल्या पाळीव प्राण्यांमध्ये तीव्रतर लाळ खुरकूत लसीकरण मोहिम राबवावी. पशुपालकांचा सहभाग वाढविण्यासाठी जंगलाजवळ राहणाऱ्या आदिवासी ग्रामीण समुदायांमध्ये जागरूकता निर्माण करावी.

१७ . केंद्र शासनाकडील सूचनांनुसार भारत पशुधन प्रणालीवरील नोंदी ह्याच लसीकरण आकडेवारी म्हणून गृहीत धरल्या जाणार असलेने प्रथम पासूनच नोंदी पूर्ण कराव्यात. भारत पशुधन प्रणालीवरील नोंदी पूर्ण करणेस या वेळी अल्प कालावधी उपलब्ध राहणार असलेने संस्था स्तरावरून या नोंदी शक्यतो त्याच दिवशी केल्या जातील या बाबतीत सूचना द्याव्यात. लसीकरणाचा दैनंदिन अहवाल तालुका स्तरावरुन जिल्ह्याला व जिल्हा स्तरावरुन प्रादेशिक सहआयुक्त कार्यालयास विहित कालावधीत सादर होईल, यासाठी कार्यालयाच्या एका कर्मचारी/अधिकारी यांस नामनिर्देशित करावे.दैनंदिन अहवाल सादर

करताना भारत पशुधन प्रणालीवरील झालेल्या नोंदी दैनंदिन अहवालात नमूद कराव्यात . प्रादेशिक सहआयुक्त कार्यालयानी विभागाचा एकत्रित अहवाल दररोज सकाळी अकरा पर्यंत fmdrcpune@gmail.comया ई -मेल वर पाठवला जाईल हे कटाक्षाने पहावे. लसीकरणाचा दैनंदिन अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्ठ -२ व ३ नुसार सादर करणेत यावा.राज्याचा एकत्रित अहवाल केंद्र शासनास सादर करावा लागत असल्याने पत्रासोबत सोबत जोडलेल्या Excel Sheet मध्ये वाया गेलेल्या मात्रासह बिनचूक माहिती भरून रोग अन्वेषण विभागास सादर करावी.या अहवालातील क्रमा मध्ये बदल करण्यात येऊ नये.

१८. लसीकरण मोहिमे दरम्यान करण्यात येणाऱ्या लसीकरणाचे संनिरिक्षण करणेकरीता सोबत जोडलेल्या तपशिलानुसार जिल्हानिहाय राज्यस्तरीय अधिकारी नामनिर्देशित करण्यात येत आहेत (परिशिष्ठ -४).सदर अधिकारी यांनी राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक लसीकरण मोहिमेचीही(पीपीआर,बृसेल्ला, सिएसएफ) माहिती घेणे आवश्यक असून त्यानुसार अहवाल रोग अन्वेषण विभाग, पुणे या कार्यालयास सादर करण्यात करावा. राज्याचा एकत्रित संनिरिक्षण अहवाल प्रत्येक मोहिम संपताच रोग अन्वेषण विभाग, पुणे यांनी मा. आयुक्त यांना सादर करावा.जिल्हानिहाय नामनिर्देशित अधिकारी संबंधित जिल्ह्यात अचानक किंवा नियोजित भेटीसाठी आल्यानंतर जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी राज्यस्तरीय नोडल अधिकारी यांच्या निवासाची व वाहनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

१९. दि. ०५.०३.२०२५ पासून केंद्र शासनाने गाय वर्ग व म्हैस वर्ग यांचे इयर टॅगिंग करून भारत पशुधन नोंदणी करिता प्रति पशु ५ रुपये आणि लाळ खुरकत लसीकरण व त्यांची भारत पशुधन नोंदणी करिता प्रति पशु ५ रुपये असे मानधन निश्चित केले आहे. लसीकरण केल्यानंतर त्याची भारत पशुधन प्रणाली वरील नोंदणी केल्यानंतर मानधन देय राहील याची सर्व संबंधितांना कल्पना द्यावी. खाजगी लसीकरण कर्त्यांचे मानधन प्राधान्याने अदा करावे .

सन २०२५ -२६ मध्ये केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रम अंमलबजावणीसाठी शीतसाखळी सुविधा, गावनिहाय मोहिमेचे व आवश्यक अतिरिक्त मनुष्यबळाचे नियोजन करणे याची जबाबदारी जिल्हा सनियंत्रण समिती व तालुका सनियंत्रण समितीची असून सदर बाबत संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित सविस्तर मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करावे. क्षेत्रीय यंत्रणेस सर्व सुचना तात्काळ अवगत करुन लाळ-खुरकुत प्रतिबंधात्मक लसीकरण फ़ेरी-७ ची कालबद्ध व प्रभावी अंमलबजावणी करण्याची सर्वांनी खबरदारी घ्यावी.

(डॉ. प्रवीणकुमार देवरे,भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७.

प्रत-

- मा.सचिव,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यविकास,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
- सहआयुक्त पशुसंवर्धन,रोग अन्वेषण विभाग,पुणे-६७
- सहआयुक्त पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज),पशुसंवर्धन आयुक्तालय,पुणे यांस माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

# ANNEXU…E-1 DAILY VACCINATION RECORD-7th …ound NADCP-FMD

DVP/TVP/VD ..... Tal- Dist-.... Date- / /2025

| Sr. No. | Livestock owner details | | | | Actual number of livestock | | | | | Number of vaccinated livestock | | | | Number of unvaccinated livestock | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Name/Father's/Husband's Name of the Cattle Owner | Category (General/ Sect.Caste/ Sect.Tribe) | Aadhaar Number | Mobile no | Cattle | Buffalo | Calves | | Ear Tag NUMBER | Cattle | Buffalo | Calves | | Pregnant | (less than 4 months) | | Owner refused | Diseased livestock |
| | | | | | Cattle | Buffalo | Cattle | Buffalo | | Cattle | Buffalo | Cattle | Buffalo | | Cattle | Buffalo | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 1 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 13 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 14 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 15 | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | Total | | | | | | | | | | | | | | | | | |

ANNEXURE - II

| Sr. No. | Name of District | Target Cattle&Buff.Population to be vaccinated | Vaccine Balance from Previous Round | Vaccine received during Round 7 | Actual Vaccine doses available for Vaccination | Cumulative FMD Vacc. Till date | % Vaccination against Census | % Vaccination against Vaccine supply | Wastage till date | Balance Vaccine |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FMD Vaccination NADCP-7 As on .2025 | | | | | | | | | | |
| | | 1 | 2 | 3 | 4 (2+3) | 5 | 6 | 7 | 8 | 9 (4-8) |
| 1 | Mumbai | 26240 | 0 | | 0 | | 0 | #DIV/0! | | 0.00 |
| 2 | Thane | 147645 | 9350 | | 9350 | | 0 | 0 | | 9350.00 |
| 3 | Palghar | 257864 | 28394 | | 28394 | | 0 | 0 | | 28394.00 |
| 4 | Raigad | 174735 | 29483 | | 29483 | | 0 | 0 | | 29483.00 |
| 5 | Ratnagiri | 195976 | 26200 | | 26200 | | 0 | 0 | | 26200.00 |
| 6 | Sindhudurg | 134635 | 15100 | | 15100 | | 0 | 0 | | 15100.00 |
| | **Mumbai Region** | 937095 | 108527 | 0 | 108527 | 0 | 0 | #DIV/0! | 0 | 108527 |
| 7 | Nashik | 1022293 | 35511 | | 35511 | | 0 | 0 | | 35511.00 |
| 8 | Jalgaon | 745053 | 75704 | | 75704 | | 0 | 0 | | 75704.00 |
| 9 | Dhule | 389112 | 30000 | | 30000 | | 0 | 0 | | 30000.00 |
| 10 | Nandurbar | 331958 | 0 | | 0 | | 0 | #DIV/0! | | 0.00 |
| 11 | Ahilyanagar | 1499893 | 75858 | | 75858 | | 0 | 0 | | 75858.00 |
| | **Nashik Region** | 3988309 | 217073 | 0 | 217073 | 0 | 0 | #DIV/0! | 0 | 217073 |
| 12 | Pune | 1034415 | 109500 | | 109500 | | 0 | 0 | | 109500.00 |
| 13 | Satara | 608623 | 11650 | | 11650 | | 0 | 0 | | 11650.00 |
| 14 | Sangli | 679587 | 141270 | | 141270 | | 0 | 0 | | 141270.00 |
| 15 | Solapur | 1143832 | 102915 | | 102915 | | 0 | 0 | | 102915.00 |
| 16 | Kolhapur | 799859 | 101716 | | 101716 | | 0 | 0 | | 101716.00 |
| | **Pune Region** | 4266316 | 467051 | 0 | 467051 | 0 | 0 | 0 | 0 | 467051 |
| 17 | Aurangabad | 473568 | 98900 | | 98900 | | 0 | 0 | | 98900.00 |
| 18 | Jalna | 375266 | 113650 | | 113650 | | 0 | 0 | | 113650.00 |
| 19 | Parbhani | 304907 | 68550 | | 68550 | | 0 | 0 | | 68550.00 |
| 20 | Beed | 505273 | 157500 | | 157500 | | 0 | 0 | | 157500.00 |
| | **Aurangabad Regio** | 1659014 | 438600 | 0 | 438600 | 0 | 0 | 0 | 0 | 438600 |
| 21 | Latur | 361183 | 96750 | | 96750 | | 0 | 0 | | 96750.00 |
| 22 | Osmanabad | 371369 | 137517 | | 137517 | | 0 | 0 | | 137517.00 |
| 23 | Nanded | 576182 | 130450 | | 130450 | | 0 | 0 | | 130450.00 |
| 24 | Hingoli | 230251 | 37826 | | 37826 | | 0 | 0 | | 37826.00 |
| | **Latur Region** | 1538985 | 402543 | 0 | 402543 | 0 | 0 | 0 | 0 | 402543 |
| 25 | Amaravati | 411937 | 116814 | | 116814 | | 0 | 0 | | 116814.00 |
| 26 | Akola | 202011 | 23724 | | 23724 | | 0 | 0 | | 23724.00 |
| 27 | Buldhana | 477280 | 110376 | | 110376 | | 0 | 0 | | 110376.00 |
| 28 | Washim | 150356 | 35573 | | 35573 | | 0 | 0 | | 35573.00 |
| 29 | Yeotmal | 470910 | 199490 | | 199490 | | 0 | 0 | | 199490.00 |
| | **Amaravati Region** | 1712494 | 485977 | 0 | 485977 | 0 | 0 | 0 | 0 | 485977 |
| 30 | Nagpur | 367235 | 33100 | | 33100 | | 0 | 0 | | 33100.00 |
| 31 | Gondia | 281034 | 16734 | | 16734 | | 0 | 0 | | 16734.00 |
| 32 | Gadchiroli | 381219 | 3000 | | 3000 | | 0 | 0 | | 3000.00 |
| 33 | Bhandara | 228356 | 40075 | | 40075 | | 0 | 0 | | 40075.00 |
| 34 | Chandrapur | 325928 | 0 | | 0 | | 0 | #DIV/0! | | 0.00 |
| 35 | Wardha | 249900 | 0 | | 0 | | 0 | #DIV/0! | | 0.00 |
| | **Nagpur Region** | **1833672** | **92909** | **0** | **92909** | **0** | **0** | **#DIV/0!** | **0** | **92909** |
| | **Maharashtra State** | **15935885** | **2212680** | **0** | **2212680** | **0** | **0** | **#DIV/0!** | **0** | **2212680** |

ANNEXURE – III

| Sr. No. | Date | DISTRICT | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | No of farmers impacted / Covered | No of calves vaccinated during the day (age 4-5 months) | | | Is booster dose being given to | If booster dose is given to calves (yes in column ' o" then no of calves given booster dose | | |
| | | Cow class | Buffalo class | Total | Collected Servise Charges(Rs.) | | Cattle | Buffalo | Total vccinated | (Yes/NO) | Cattle | Buffalo | Total vccinated (Booster) |
| 1 | 14-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | 15-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | 16-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | 17-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | 18-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | 19-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | 20-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | 21-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | 22-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | 23-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | 24-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | 25-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | 26-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | 27-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 15 | 28-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | 29-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 17 | 30-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 18 | 31-08-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | 01-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 20 | 02-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | 03-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 22 | 04-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | 05-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | 06-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | 07-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | 08-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 27 | 09-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 28 | 10-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 29 | 11-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 30 | 12-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 31 | 13-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 32 | 14-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 33 | 15-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 34 | 16-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 35 | 17-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 36 | 18-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 37 | 19-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 38 | 20-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 39 | 21-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 40 | 22-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 41 | 23-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 42 | 24-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 43 | 25-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 44 | 26-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 45 | 27-09-2025 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Total | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

Annexure - IV

| Maharashtra : NADCP - FMD Round-VII / Brucella/PPR Vaccination Monitoring Nodal Officer | | |
|---|---|---|
| Sr.No. | Designation of the District Nodal Officer | District |
| 1 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying ,PDDL, DIS | Sangli |
| 2 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, Surveillance,DIS | Nashik |
| 3 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, Virology,DIS | Ahilyanagar, Washim |
| 4 | Deputy Commissioner Animal Husbandry and DairyingBacteriology, DIS | Jalna |
| 5 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, Toxicology, DIS | Palghar |
| 6 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, Bovine BreedingPune | Satara |
| 7 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, MAWB,, Pune | Nanded |
| 8 | Deputy Commissioner Animal Husbandry and Dairying, QC Lab Goregaon, Mumbai | Pune |
| 9 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Q.Control, CAH, Pune | Hingoli, |
| 10 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Quality Control, CAH, Pune | Latur, Dharashiv |
| 11 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Bovine Breeding, CAH, Pune | Mumbai |
| 12 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, MAWB, CAH, Pune | Kolhapur |
| 13 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, State Property, CAH, Pune | Chh.Sambhajinagar |
| 14 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, FMDRC, DIS | Thane |
| 15 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Nagpur | Chandrapur, Gadchiroli |
| 16 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Akola | Akola, Yavatmal |
| 17 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Chh.Sambhajinagar | Jalgaon, Parbhani |
| 18 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Latur | Beed |
| 19 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Nashik | Nandurbar, Dhule |
| 20 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Ahilyanagar | Solapur |
| 21 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Kolhapur | Ratnagiri |
| 22 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, RDIL, Chiplun/ Mumbai | Raigad |
| 23 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Central hatchery Pune | Amaravati |
| 24 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Central hatchery Nagpur | Nagpur, Bhandara |
| 25 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Central hatchery Chh.Sambhajinagar | Buldana |
| 26 | Assistant Commissioner Animal Husbandry and Dairying, Central hatchery Kolhapur | Sindhudurg |
| 27 | Livestock development Officer, Duck Breeding Farm Wadsa | Wardha, Gondia |

All District Nodal Officer should visit at least 5 institutes in the District ,twice during the FMD vaccination Round -7 ( 14.08.2025 to 28.09.2025) .They should submit attached inspection format to Joint Commissioner ,DIS and also to corresponding District Deputy Commissioner, AHD. They should also take review of pre -post vaccination serum sample collection, PPR vaccination and CSF vaccination . The villages selected for sero monitoring should be visited alongwith verification of deworming and sample collection .

13/8/25

( Dr.Pravinkumar Deore, I.A.S.)
Commissioner, Animal Husbandry
Maharashtra State, Pune-67